# क्रांतिवीर रंगरावदादा नररत्न

## एन. डी. पाटील : कमला महाविद्यालयात पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण



कोल्हापुरात मंगळवारी ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयामध्ये क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण करताना ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील, बाबूराव धारवाडे, शिवाजीराव नाईक, अण्णासाहेब डांगे, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्ता पाटील, सुप्रिया मोहिते, आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हाताला जी नररत्ने लाभली, त्यामध्ये रंगरावदादा, नागनाथअण्णा, जी. डी. लाड-बापू यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. रंगरावदादा प्राणाची बाजी लावून स्वातंत्र्याच्या मैदानात उतरले. स्वराज्य चळवळीच्या वाटा उचलताना त्यांनी केलेल्या त्यागाला तोड नाही. दादांच्या देशप्रेमाची चेतना नव्या पिढीला मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयामध्ये क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ आणि ग्रंथालयाचे क्रांतिवीर रंगरावदादा पाटील ग्रंथालय नामकरण सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी आमदार बाबूराव धारवाडे, खासदार संजयकाका पाटील, आमदार शिवाजीराव नाईक, माजी मंत्री अण्णा डांगे, माजी आमदार संपतराव पवार - पाटील, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, डॉ. एस. एन. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाटील म्हणाले, रंगरावदादा म्हणजे पहाडी आवाज, आवेश, जरब, दुसऱ्याला घायाळ करण्याचे धैर्य ही त्यांची खासियत होती. ऐन तारुण्यात त्यांनी ब्रिटिश साम्राज्याला सळो की पळो करुन सोडले होते. दादांनी काँग्रेस चळवळीला संजीवनी दिली. १९७२ च्या दुष्काळात सरकार विरुद्ध संघर्ष पुकारावा लागला. जनतेसाठी लढताना त्यांना पुत्र राजेंद्र पाटील गमवावा लागला. दादांनी घडविलेला सामाजिक इतिहास विसरणे शक्य नाही. दादांच्या देशप्रेमाचा आदर्श नव्या पिढीला होणे गरजेचे आहे.

संजयकाका पाटील म्हणाले, आजच्या शैक्षणिक संस्थेचा व्यापारीकरणाकडे कल आहे. राष्ट्रहित, समाजहित या गोष्टी त्यांच्यापासून दूर जात आहेत. मात्र, व्ही. टी. पाटील यांनी बहुजनाच्या मुलींसाठी ही संस्था उभी करुन आजही देशहित, राष्ट्रहित व समाजहित जपले आहे. प्रवाहांच्या विरोधात उभे राहून आज त्यांनी आपला उद्देश बाजूला ठेवला नाही.

आमदार शिवाजीराव नाईक, माजी मंत्री अण्णा डांगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी रंगरावदादा यांचा जीवनप्रवास थोडक्यात उलगडून सांगितला. आझाद नायकवडी यांनी दादांवरील पोवाडा सादर केला. जयसिंग सावंत यांनी आभार मानले. कार्यक्रमास विजयकुमार पाटील, ॲड. प्रकाश हिलगे, प्राजक्ता पाटील, अरुण लाड, प्रा. सुजय पाटील यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, परिसरातील मान्यवर उपस्थित होते. (प्रतिनिधी)